<u>नि.मु.नं. ९७१/२०२४</u>
<u>व्यंकट व मनोहर व ईतर</u>

**<u>निशाणी क्र. ११ खालील आदेश.</u>**

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी त्यांचे प्रस्तुत दाव्याकामी असलेला जवाबदावा दाखल करण्याकामी झालेल्या विलंबाकरीता उशिरमाफी करीता अर्ज केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ८ यांनी अर्जात असे कथन केले की, प्रतिवादींना वेळेत आवश्यकत ते कागदपत्रे न मिळाल्यामुळे त्यांना जवाबदावा दाखल करण्यास उशीर झालेला आहे. प्रतिवादी यांनी जाणुन—बुजुन जवाबदावा देणेस उशीर केलेला नाही. त्यामुळे, जवाबदावा दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ होऊन मिळावा अशी विनंती केली.

३. वादीतर्फे सदर अर्जावर म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जाला विरोध दर्शवुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ८ यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. दिवाणी प्रकिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे, न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे प्रतिवादी क्र.१ ते ८ यांना त्याची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेशः—

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ८ यांना कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब **<u>प्रत्येकी रू.२००/— (अक्षरी दोनशे रूपये फक्त)</u>** च्या खर्चावर माफ करण्यात येतो.

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2026.04.16 16:36:23 +0530

ठिकाण—औसा.
दिनांक : १६/०४/२०२६.

**(श्री. पी. पी. आवटे)**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, औसा